राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार

(गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी)

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४१३ ००१

तक्रार क्रमांक ११०२/२०२० (द्वितीय अपील क्र.१५४०/२०१९मध्ये)

श्री.रमेश सुखदेवराव धनेगावकर,
मैत्रये ज्ञानतिर्थ सोसायटी, प्लॉ.क्र७
सिडको एन-८ औरंगाबाद ४३१०३

तक्रारदार

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा
तहसील कार्यालय,वैजापूर
,जि.औरंगाबाद

: उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय,
वैजापूर,जि.औरंगाबाद

( सुनावणी दिनांक ३१.०८.२०२१)

निर्णय

तक्रारदार यांनी दि.३१.१२.२०२०रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे द्वितीय अपील क्र.१५४०/२०१९ मध्ये आयोगाने दि.१५.०७.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीची सुनावणी गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल तक्रारदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच सदर नोटीस आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार आज रोजी प्रकरणात गुगल मीट अॅपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येत

आहे. ऑनलाईन सुनावणीसाठी तक्रारदार, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांनी आयोगासमोर असे कथन केले की, आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. यावर जनमाहिती अधिकारी यांनी कथन केले की, माहिती संदर्भातील संचिका उपलब्ध नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करता आलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमक्ष उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, आयोगाने द्वितीय अपील क्र. १५४०/२०१९ मध्ये दि.१५.०७.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबतचा कोणताही पुरावा आयोगसमोर सादर केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने द्वितीय अपिलामध्ये दिलेल्या आदेशानुसार मुददा, क्र.२,३,४ च्या संदर्भातील माहिती उपलब्ध नसल्याची १००रु./- च्या बॉडवर नमुद करुन असे शपथपत्राद्वारे तक्रारदार यांना वस्तुस्थितीसह मूळ शपथपत्र तक्रारदारास १५ दिवसात उपलब्ध करुन दयावे, असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे. आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी कार्यवाही करतील, ही बाब तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर यांनी पहावी व त्यासंदर्भात अहवाल आयोगास १५ दिवसात सादर करावा, याकरिता कलम १९(८) (क) १९(७) नुसार प्राप्त अधिकारानुसार तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाचे अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणाऱ्या ठरतात. या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अशा सर्व कृती अनुसरुन अधिनियमातील कलम २०(१) नुसार करावयाच्या कारवाईस स्वत: ला पात्र ठरविलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी तहसील कार्यालय, वैजापूर यांना या प्रकरणी रु.५,००० /- (अक्षरी रुपये पाच हजार) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, वर नमूद केल्याप्रमाणे जबाबदार जन माहिती अधिकारी यांची नावे निश्चित करुन त्यांचेकडून शास्तीची रक्कम वसूल करुन ती खालील लेखा शिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८) (क) व कलम १९ (७)अन्वये जिल्हाधिकारी ,जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

लेखाशिर्ष :- ००७०- इतर प्रशासनिक सेवा

-        ६०- इतर सवा
:-        ८००- इतर जमा रक्कम
.-        १८- माहिती अधिकार ००७०-००६-१

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त विवेचनाच्या अधिन राहून तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( दिलीप ल. धारुरकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र. ५०७ दि. 24/1/2022

प्रत :- माहिती तथा कार्यवाही / अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. तहसीलदार, तहसील कार्यालय, वैजापूर,जि.औरंगाबाद
२. संबंधित जन माहिती अधिकारी , तहसील कार्यालय ,वैजापूर ,जि.औरंगाबाद यांना मार्फत जिल्हाधिकारी ,जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद